## निशाणी क्र. २४ वरील आदेश

०१) प्रस्तूत प्रकरण अर्जदारांनी कौटुंबीक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम–२००५, कलम–१२ अन्वये दाखल केले आहे.

०२) गैरअर्जदार क्र. १ याने नि.क्र. २४ वर अर्ज दाखल केला आहे. गैरअर्जदार क्र. १ याचे कथन आहे की, अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. १ यांचा मुलगा नामे प्रिन्स हा सुमारे ४ वर्षाचा असून तो अर्जदारांसोबत राहत आहे. गैरअर्जदार क्र. १ याने सदर लहान मुलास भेटण्याचे प्रयत्न केले. तथापि,अर्जदार क्र. १ ही त्यास भेटू देत नाही. त्याने या न्यायालयात मुलाचा ताबा मिळावा म्हणून अर्ज दाखल केला होता. तो न्यायालयाने फेटाळला आहे. अर्जदार व गैरअर्जदार यांच्यातील नातेसंबंध अतिशय खराब झालेले आहेत. त्यामुळे, गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदार क्र. १ च्या माहेरी जावून मुलास भेटू शकत नाही. गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांनी न्यायालयीन परिसराबाहेर मुलाला भेटण्याचे प्रयत्न केले असता अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये वाद होवून अप्रिय घटना होण्याची दाट शक्यता आहे. गैरअर्जदार क्र. १ याचा सदर मुलावर अर्जदार ऐवढाच हक्क व अधिकार आहे. सबब, गैर अर्जदार क्र. १ याने अर्ज मंजुर करुन त्याचा मुलगा प्रिन्स यास भेटण्याची परवानगी देणेबाबत विनंती केली आहे.

०३) अर्जदार क्र. १ हीने निशाणी क्र. २७ वर म्हणणे दाखल केले आहे. अर्जदार क्र.१ हीने कथन केले आहे की, गैरअर्जदाराने मुलास भेटण्याचे प्रयत्न केले नाही. तसेच त्याच्या तब्येतीची किंवा शिक्षणाची काळजी केली नाही व संपर्क केला नाही. गैरअर्जदाराने वडिल म्हणून कर्तव्य पार पाडले नाही. त्यामुळे, त्यास भेटण्याचा अधिकार नाही. सबब, अर्ज नामंजूर करणेबाबत त्यांनी विनंती केली आहे.

०४) गैर अर्जदार याच्या वतीने विद्वान विधिज्ञाचा युक्तिवाद ऐकला. अर्जदार व त्यांचे विधिज्ञ यांचा वेळोवेळी पुकारा केला असता गैरहजर. सबब, अर्जदाराच्या वतीने युक्तिवाद नाही. उभय पक्षकारांची विवादीत कथने व अभिलेखाचा विचार करता पुढील वादप्रश्न विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदिवण्यात येत आहेत;

| अ.क्र. | वादप्रश्न | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अर्ज मंजूर होणेस पात्र आहे काय? | : | होकारार्थी |
| २. | आदेश काय ? | : | अर्ज मंजूर करण्यात येतो... |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>वादप्रश्न क्र. १ करीता</u> :–**

०५) प्रकरणी अर्जदार व गैरअर्जदार यांचे नातेसंबंध हे कबूल तथ्ये आहे. उभयपक्षकारांमधील नातेसंबंध विचारात घेता, अर्जदार क्र.१ ही लहान मुलगा नामे पार्थ उर्फ प्रिन्स श्रीकांत उर्फ भूपेंद्र आडे याची आई व गैरअर्जदार क्र. १ हा त्याचा वडिल असल्याचे स्पष्ट होते. उभयपक्षकारांची विवादीत कथने विचारात घेता लहान बालक अर्जदार क्र. २ हा अर्जदार क्र. १ यांच्या ताब्यात असल्याचे स्पष्ट होते. गैरअर्जदार क्र.१ हा त्याचा वडिल असल्याने त्यास लहान बालकास भेटण्याचा कायदेशिर अधिकार आहे. अर्जातील कथन विचारात घेता, अप्रिय घटना टाळण्याचे हेतूने, सदर भेटीचे ठिकाण खाजगी वास्तु अथवा न्यायालयीन परिसर निश्चित करणे योग्य नाही. भेटीकरिता संरक्षण अधिकारी, पंचायत समिती, घाटंजी यांचे कार्यालय योग्य ठिकाण असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे, ते ठिकाण भेटीचे ठिकाण म्हणून निश्चित करणे योग्य आहे. सबब, वादप्रश्न क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदविला आहे.

**<u>वादप्रश्न क्र. २ करीता</u> :–**

०६) प्रकरणी अर्जदार क्र. १ व २ हे उदरनिर्वाह करीता गैरअर्जदार क्र.१ याचेवर अवलंबून असल्याने सद्यस्थितीत खर्चाबाबत आदेश करणे न्यायाचे व योग्य नाही. सबब, मी पुढील आदेश करीत आहे;

## <u>आदेश</u>

(१) अर्ज निशाणी क्र. २४ मंजूर करण्यात येतो.

(२) गैर अर्जदार क्र. १ ते ३ यांना लहान मुलगा नामे पार्थ उर्फ प्रिन्स श्रीकांत उर्फ भूपेंद्र आडे यास प्रत्ये महिण्याच्या १ तारखेस (१ तारखेस सुटी असल्यास त्या पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी) सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत संरक्षण अधिकारी, पंचायत समिती, घाटंजी यांच्या कार्यालयात भेटण्याची परवानगी देण्यात येते.

(३) अर्जदार क्र. १ यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी सदर निश्चित केलेल्या दिवशी अर्जदार क्र. २ यास घेवून गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांच्या भेटीकरिता आवश्यक ती व्यवस्था व सहकार्य करावे.

(४) संरक्षण अधिकारी, पंचायत समिती, घाटंजी यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी सदर भेटीच्या कार्यवाही करिता आवश्यक ती व्यवस्था करावी व लहान मुलाच्या भेटीनंतर उभयपक्षकारांच्या वर्तणुकी संदर्भात अहवाल या न्यायालयास सादर करावा.

(५) या अर्जाचा खर्च अंतीम निर्णय ज्याच्या पक्षात होईल त्यास देणेत यावा.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित केला)

Digitally signed by UTPAT ATUL ARUN
Date: 2024.08.19 16:47:39 +0530

(अ.अ. उत्पात)
दिनांक :– १९/०८/२०२४. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्या.क्र.१) घाटंजी, जि. यवतमाळ.